RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १२४(३)] बुधवार, सप्टेंबर २८, २०२२/आश्विन ६, शके १९४४ [पृष्ठे ३९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३४१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ सप्टेंबर, २०२२.

**अधिसूचना**

**नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२.**

क्रमांक. नामपा-२०१७/प्र.क्र.२३३(भाग-१)/नवि-२५.—नाशिक महानगरपालिकेमध्ये आरोग्य व अग्निशमन विभागासाठी अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवा प्रवेश नियम तसेच तत्संबंधात यापुर्वी करण्यात आलेले ठराव व आदेश यांचे अधिक्रमण करुन, शासन याद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) अंतर्गत नाशिक महानगरपालिकेमधील आरोग्य व अग्निशमन विभागातील विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :-

**नियम**

**१. संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती :-**

१. या नियमांना नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ असे संबोधण्यात येईल.

२. हे नियम अंतिमरित्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

३. हे नियम नाशिक महानगरपालिकेमधील आरोग्य व अग्निशमन विभागातील सर्व पदांवरील नियुक्त्यांना लागू होतील; मात्र, अन्यथा नमूद केले नसल्यास अंशकालिक स्वरुपाच्या नियुक्त्या, कंत्राटी पध्दतीने किंवा रोजंदारी तत्त्वावरील नियुक्त्या तसेच, मानसेवी स्वरुपाच्या नियुक्त्यांना लागू होणार नाहीत.

**२. (अ) व्याख्या :-**

विषय किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमांसाठी :-

(१) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९).

(२) "परिशिष्ट" म्हणजे या नियमांना जोडलेली परिशिष्टे.

(३) "नियुक्ती प्राधिकारी" म्हणजे अधिनियमाच्या कलम ५३ च्या पोटकलम (१) ते (३) च्या तरतुदीप्रमाणे नियुक्ती देण्यास सक्षम असलेला अधिकारी.

(४) "संवर्ग" म्हणजे एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेल्या कायम त्याचप्रमाणे हंगामी शासनमान्य पदांचा समूह.

(५) "कर्मचारी" म्हणजे या नियमांच्या परिशिष्टात नमूद केलेले महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी.

(६) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(७) "एकीकृत संवर्ग" म्हणजे विविध पदांच्या कर्तव्याचे स्वरुप ती पदे धारण करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी यांचा सारासार विचार करून सेवा नियमासाठी एकीकृत केलेला संवर्ग.

(८) "महानगरपालिका" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्माण केलेली महानगरपालिका.

(९) "अर्हताप्राप्त कर्मचारी" म्हणजे नियमाच्या परिशिष्ट-२ मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी. या नियमांत वापरण्यात आलेले परंतू व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्द समुहांचा अर्थ अधिनियमात दिल्यानुसार असेल.

**२. (ब) सेवांचे वर्गीकरण (Classification of Services)**

**(१) प्रशासकीय सेवा :** सामान्य प्रशासन, प्रभाग प्रशासन, महसुल व महानगरपालिका सचिवालय अंतर्गत असलेल्या विभागातील सेवा या प्रशासकीय सेवा संबोधण्यात येतील.

**(२) लेखा सेवा :** महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवस्थापनाशी संबंधित (अर्थसंकल्प, लेखा लेखापरिक्षण, लेखा आक्षेप निराकरण व खर्च व्यवस्थापन इ.) सेवा या लेखा सेवा संबोधण्यात येतील.

**(३) तांत्रिक संवर्ग आणि तांत्रिक सेवा :** ज्या पदावरील नियुक्तीसाठी सांविधिक विद्यापीठ / अभिमत विद्यापीठ / राज्य तंत्रशिक्षण मंडळ (Board of Technical Education) वा केंद्रीय तंत्रशिक्षण मंडळ (Board of Central Technical Education) तंत्रशिक्षण परिषद (Technical Council) यांच्यामार्फत चालविले जाणारे विविध तांत्रिक व अभियांत्रिक व अभियांत्रिकी विषयक अभ्यासक्रम अशी किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल, अशा पदांना तांत्रिक संवर्ग संबोधण्यात येईल व अशा पदांची सेवा तांत्रिक सेवा संबोधली जाईल.

**(४) वैद्यकिय संवर्ग आणि वैद्यकिय सेवा :** ज्या पदावरील नियुक्तीसाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वैद्यकीय शास्त्राचा पदवीधारक, पदव्युत्तर पदवीधारक / पदविका तसेच मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया, आयुष व तत्सम आयुर्वेदिक कौन्सिल, युनानी, होमोओपॅथिक कौन्सिल यांच्याकडील नोंदणी ही किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल, अशा पदांना वैद्यकीय संवर्ग संबोधण्यात येईल व अशा पदांची सेवा वैद्यकीय सेवा संबोधली जाईल.

**(५) निमवैद्यकीय संवर्ग आणि निमवैद्यकीय सेवा :** वैद्यकीय सेवेतील पदांना सहाय्यकारी असणाऱ्या पदांच्या संवर्गाला, उदा परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ, भौतिक उपचार तज्ञ, व्यवसायपचार तंत्रज्ञ,वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, दंत आरोग्य तज्ञ, मिश्रक व औषध निर्माता इ. निमवैद्यकीय संवर्ग व अशा पदांच्या सेवेला निमवैद्यकीय सेवा संबोधण्यात येईल.

**(६) अग्निशमन सेवा :** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम,२००७ मध्ये समाविष्ट असलेल्या अग्निशमन सेवा.

**३. नेमणुकीची पध्दत व अर्हता :**

**(१)** महानगरपालिकेतील विविध पदांवर नियुक्तीची कार्यपध्दती परिशिष्ट-१ मध्ये विहित केल्यानुसार व शिक्षण अनुभव इ. आवश्यक अर्हता परिशिष्ट-२ मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील. नियुक्तीची पध्दत अधिनियमाच्या कलम ५४ व अनुसूची ड मधील प्रकरण ३ नुसार असेल.

**(२) भारतीय नागरिकत्व आणि महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र :** उमेदवार भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास (Domicile) करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबाबत जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**(३) संगणक हाताळणी / वापराबाबतच्या ज्ञानाची आवश्यकता :** परिशिष्ट-२ मध्ये विहित केलेल्या अर्हतेव्यतिरिक्त वाहनचालक आणि श्रेणी-४ ची पदे वगळून इतर सर्व पदावरील नेमणूकीसाठी / पदोन्नतीसाठी शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल असे संगणक हाताळणे / वापराबाबतचे ज्ञान, एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल.

**(४) वयोमर्यादा :** महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वयोमर्यादा परिशिष्ट-२ मध्ये संबंधित पदासमोर नमूद केल्यानुसार असेल, कमाल वयोमर्यादा विहीत केली नसेल अशा पदांच्या बाबत ती प्रचलित शासन धोरणाप्रमाणे असेल. सामाजिक आरक्षण लागू असणाऱ्या प्रवर्गाकरिता प्रचलित शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.

**(५) पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण :** (क) नामनिर्देशन वा पदोन्नतीचे प्रमाण परिशिष्ट-२ मध्ये संबंधित पदासमोर दर्शविल्यानुसार असेल. तथापि, ज्या पदासमोर असे प्रमाण विहित केलेले नसेल अशा पदावरील नियुक्तीसाठी पदोन्नती व नामनिर्देशनाचे प्रमाण ५०:५० असे राहिल.

(ख) एकाकी पद सामान्यतः पदोन्नतीने भरण्यात येईल. तथापि विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद प्रतिनियुक्ती किंवा नामनिर्देशनाने भरता येईल.

४. **पदोन्नतीने नेमणुक करणे :** पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, ज्येष्ठता नि-पात्रता या तत्त्वावर, अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांमधून केली जाईल.

५. **प्रतिनियुक्तीद्वारे नेमणुक :** या नियमांमध्ये विहित केलेल्या अर्हतेनुसार ज्या पदांवर प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक करण्याची तरतुद आहे, अशी पदे केंद्र शासन, राज्य शासन, इतर स्थानिक स्वराज्य संस्था व स्थानिक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरता येतील.

६. **अन्य महानगरपालिकेतून नाशिक महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती :** या नियमात अन्यत्र काहीही नमूद केले असले तरी, अन्य महानगरपालिकेतील कर्मचाऱ्याने एखाद्या महानगरपालिकेतील पदावर बदलीने नियुक्तीसाठी अर्ज सादर केल्यास, अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकांतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील, अशा अटी व शर्तीवर, खालील बाबींच्या अधीन राहून बदलीने नियुक्ती देता येईल.

(अ) पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्तीकरिता राखून ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

(ब) अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकाची ज्येष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

(क) गट-अ आणि गट-ब मधील अधिकाऱ्यांच्याबाबत अन्य महानगरपालिकेतून नाशिक महानगरपालिकेत बदलीचा निर्णय दोन्ही महानगरपालिकांच्या परस्पर संमतीने निश्चित अटी व शर्तीवर, शासन मान्यतेने घेतला जाईल.

७. **परिविक्षाधीन कालावधी :** गट-अ आणि गट-ब मध्ये नामनिर्देशाद्वारे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. परिविक्षाधीन कालावधी राज्य शासनाच्या आदेशानुसार पुर्ण केल्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच अशा उमेदवाराचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमूद करून परिविक्षा कालावधी पुढील १ वर्षापर्यंतच वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

८. **भाषा परिक्षा विभागीय परीक्षा व प्रशिक्षण :** महापालिका सेवेतील पदांवर नेमणुक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी

१. विहित करण्यात येतील अशा भाषा परीक्षा आणि / किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहित नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासुन सुट मिळणे आवश्यक असेल.

२. परिशिष्ट-३ अन्वये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळविणे आवश्यक असेल.

३. वेळोवेळी ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेशपुर्व आणि / किंवा सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणे सुध्दा आवश्यक असेल.

**९. महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता :**

एखाद्या व्यक्तीस :-

(क) अधिनियमाच्या कलम ५९ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल.

(ख) महापालिकेच्या सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

(ग) ज्यामध्ये नैतिक अधःपाताचा समावेश होईल अशा अपराधाबद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

(घ) जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी ह्यात असतील आणि स्त्री उमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पत्नी ह्यात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

(च) जर तो/ती महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटूबाचे प्रतिपादन) नियम, २००५ मधील तरतुदींची पुर्तता करीत नसेल, किंवा

(छ) न्यायालयात ज्या गुन्ह्यासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्ह्यासाठी सहा महिन्याहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती किंवा,

(ज) महापालिकेच्या सेवेत असतांना सिध्दापराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल,

अशी व्यक्ती महापालिकेच्या सेवेत नेमणुक देण्यास वा नेमणुक चालू ठेवण्यास अपात्र समजली जाईल.

**१०. महानगरपालिका सेवेतील पदांवर आरक्षण :** महानगरपालिका सेवेतील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल. यामध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण (सामाजिक आरक्षण) विशेष / समांतर आरक्षण, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, अपंग, महिला, खेळाडू इ. साठीच्या आरक्षणाचा समावेश असेल.

**११. शारिरीक पात्रता प्रमाणपत्र आणि चारित्र्य पडताळणी अहवाल :** महापालिका सेवेतील कोणत्याही पदावरील नामनिर्देशनाने नियुक्ती :

(अ) महापालिकेच्या सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील आरोग्यविषयक वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, आणि

(ब) उमेदवाराच्या पुर्वचारित्र्य पडताळणी बाबत (Verification of Antecedents) सक्षम प्राधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर केली जाईल.

**१२. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबावतंत्राचा वापर :** कोणत्याही उमेदवाराच्या नियुक्तीसंदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न हा त्या उमेदवाराला त्या पदावरील नियुक्तीसाठी अनर्ह करणारा ठरेल.

१३. हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी विहित मार्गाने झालेल्या सरळसेवा नियुक्त्यांना शासनाने अन्यथा वेगळे लेखी कारणे नमूद करून निर्देश दिले नसतील तर या नियमातील तरतुदीमुळे बाधा येणार नाही.

१४. वेळोवेळी सेवाभरती / आरक्षण / वयोमर्यादा / परिविक्षाधीन कालावधी नियमित करणे, इ. बाबत निर्देश देणारे राज्यशासनाने नियम, अधिनियम निर्णय व न्यायनिर्णय यानुसार या नियमात सुधारणा (Amendement) करण्यात येईपर्यंत शासन निर्णय / न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५. सदर सेवा प्रवेश नियम महानगरपालिकांना लागू झाल्याचा दिनांकापासून तीन महिन्याच्या आत नाशिक महानगरपालिकेने या नियमातील आकृतीबंधास अनुरुप एकीकृत संवर्गाची यादी तयार करून त्यास राज्यशासनाची मान्यता घेणे बंधनकारक राहील (परिशिष्ट-४).

**वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना**

(नियम ४ पहा)

मी, याद्वारे प्रमाणित करतो / करते की, ------------------------------------महापालिकेच्या (            ) संवर्गातील (          ) पदावर नेमणूक करण्यासाठी असलेले उमेदवारांची तपासणी केली आणि त्याला / तिला ------------------------------- अतिरिक्त (सांसर्गिक किंवा अन्य) कोणताही रोग,शारिरीक दौर्बल्य किंवा शारिरीक अपंगत्व असल्याचे आढळले नाही ही गोष्ट (          ) कार्यालयात (          ) म्हणून नेमणूकीसाठी अनर्ह ठरविणार आहे असे मला वाटत नाही. श्री./ श्रीमती------------------------------- यांच्या स्वतःच्या निवेदनावरुन त्याचे / तिचे वय -------- वर्ष आहे आणि दिसण्यावरुन तो / ती सुमारे --- वर्ष वयाचा / वयाची आहे. त्याला / तिला लस टोचण्यात आली आहे.

ओळख चिन्हे ------------------------------

डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा ------------------------------

वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम ------------------------------

वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम

**नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२**

**परिशिष्ट-१**

नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ अंतर्गत सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती

१. **कर्मचारी निवड समिती :** महानगरपालिका पदांवर नियुक्तीकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये विहित केल्यानुसार कर्मचारी निवड समिती गठीत करण्यात येईल. याव्यतिरिक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करताना, मागासवर्गीय तसेच महिला उमेदवारांच्या हितरक्षणासाठी अशा समितीचे सदस्य म्हणून शासनाच्या प्रचलित आदेशानुसार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मुलाखतीच्या वेळेस विशेष निमंत्रित म्हणून बोलावले जाईल.

२. **नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.**

| | | |
|---|---|---|
| (१) आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | - | अध्यक्ष |
| (२) मुख्य लेखा परीक्षक | - | सदस्य |
| (३) संबंधित विभाग प्रमुख | - | सदस्य |
| (४) आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला एक अन्य अधिकारी / मागासवर्गीय प्रतिनिधी | - | सदस्य |
| (५) जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | - | सदस्य |
| (६) जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - | सदस्य |
| (७) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - | सदस्य |
| (८) अल्पसंख्यांक प्रतिनिधी | - | सदस्य |
| (९) उप आयुक्त (आस्थापना) | - | सदस्य सचिव व निमंत्रक |

**३. नामनिर्देशनाद्वारे नेमणुकीकरिता कार्यपध्दती :**

(अ) एखाद्या पदावरील नियुक्तीसाठी, वृत्तपत्रातील जाहिरातीला अनुसरुन किंवा महानगरपालिकेच्या सुचना फलकावरील सुचनेस अनुसरुन विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाचा किंवा सेवा विनियम केंद्राकडून वा शासनाच्या आदेशानुसार अन्यसंस्था / कार्यालयाकडून आलेल्या यादीतील उमेदवाराच्या नावाचाच विचार करता येईल.

(ब) उमेदवाराने अर्जात दिलेल्या तपशिलाबाबत अधिक माहिती मागविण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

(क) जाहिरातीत / सेवा विनियम केंद्राकडे पाठविलेल्या मागणी पत्रात लेखी चाचणीचा उल्लेख असल्यास अशा उमेदवारांना लेखी चाचणी द्यावी लागेल. परंतु, जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या आणि पात्र उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन अशी चाचणी न घेण्याचा निर्णय आयुक्तांना घेता येईल.

(ड) निवड समिती यानंतर एकूण गुण लक्षात घेऊन गुणांच्या उतरत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करील व ती आयुक्ताकडे पाठविण्यासाठी लिफाफ्यात बंद करील.

**४. पदोन्नतीने नेमणुकीकरिता कार्यपध्दती :**

(अ) पुढील कॅलेंडर वर्षाच्या कालावधीत प्रत्येक संवर्गात पदोन्नतीने किती पदे भरावी लागणार आहेत याचा आढावा आस्थापना विभागाने दरवर्षी ऑगस्ट महिन्यात किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर घ्यावा.

(ब) वर नमूद केलेल्या आढाव्यानुसार पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या निश्चित झाल्यावर पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांतून ज्येष्ठतानुक्रमाने पदांच्या संख्येच्या तिप्पट (१:३) कर्मचाऱ्यांचा विचारक्षेत्रात (Zone of Consideration) समावेश करण्यात येईल.

(क) ज्याच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू असेल वा जे निलंबित आहेत त्यांचीही नावे ज्येष्ठतानुक्रमाने यादीत येत असल्यास अशा यादीतून वगळण्यात येऊ नयेत. त्यांच्या नावाचा विचार केल्यावर निवड समितीचा अभिप्राय त्यांच्या नावासमोर नोंदविण्यात यावा.

(ड) निवडसुचीत समावेश झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाची मागील पाच वर्षाची सरासरी क्रमवारी अतिउत्कृष्ट असेल अशा कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेप्रमाणे येणाऱ्या ६ स्थानापर्यंत वरचे स्थान देण्याची शिफारस निवड समितीला करता येईल. हा अपवाद वगळता, पदोन्नतीसाठी पात्र ठरलेला कर्मचाऱ्यांचा निवडसुचीत ज्येष्ठतेनुसार समावेश करण्यात येईल. मात्र अत्युत्कृष्ट (अ+) अहवालासाठी कर्मचाऱ्यांला निवडसुचीत वरचा क्रमांक देतांना सेवेने ज्येष्ठ असलेल्या व उत्कृष्ट (अ) अहवाल असणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा वरचे स्थान देता येणार नाही.

(इ) दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर निवड समितीच्या बैठका विभागनिहाय आयोजित करण्यात येतील.

(ई) निवड समिती कर्मचाऱ्यांचे मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवाल आणि त्यांचेपुढे ठेवलेली इतर कागदपत्रे यांचे अवलोकन करून कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या योग्यतेबद्दल निर्णय घेईल. मात्र असा निर्णय एकमताने झाला नाही तर त्याबद्दलचा अंतिम निर्णय समिती प्रमुखाचा असेल.

(फ) कर्मचाऱ्यांच्या निवडीसंबंधी अंतिम निर्णय घेण्यापुर्वी अधिक माहितीची आवश्यकता वाटल्यास माहिती मागविण्याचा समितीस अधिकार असेल.

५. वरील (३) व (४) नुसार निवड समितीने केलेली शिफारस अधिनियमाच्या कलम ५३ (१), ५३ (२), व ५३ (३) नुसार संबंधित सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी ठेवली जाईल.

६. तयार करण्यात आलेली निवडसुची तयार केल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध असेल.

७. समिती सचिव बैठकीचा कार्यवृत्तांत तयार करून त्यास समितीची मान्यता घेण्यास जबाबदार असेल. सदस्यांना सादर केलेली सर्व कागदपत्रे परत घेऊन ती एकत्रित जतन करण्याची जबाबदारी समिती सचिवाची असेल.

८. गट-क आणि गट-ड मध्ये सेवा भरती करतांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.न्याप्र-१००३/९९/ प्र.क्र.२/०३ (भाग-२)/१६अ, दि.२५ ऑक्टोबर, २००५ अन्वये एकत्रित मार्गदर्शक तत्त्वाचा लागू असेल तेथे अवलंब करण्यात यावा. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये वेळोवेळी होणारे बदलही अंमलात आणण्यात यावेत.

९. तांत्रिक पदांना अतांत्रिक संवर्गामध्ये पदोन्नती देता येणार नाही.

## नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२

### परिशिष्ट (२)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ व ५३ (१) च्या तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठी कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता (पहा (नियम ३))

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रेणी-१ आरोग्य सेवा | वैद्यकिय आरोग्य अधिकारी | नामनिर्देशन | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर एम.डी.(पी.एस.एम) परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) मान्यताप्राप्त विद्यापीठाची रुग्णालय प्रशासन पदविका (DHA/DHM) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>क) केंद्र शासनाच्या आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रम/योजना बाबतच्या प्रशासकीय कामाचा किमान ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>ड) राज्य शासन/केंद्र शासन/स्थानिक स्वराज्य संस्था यांचेडील सहाय्यक आरोग्य अधिकारी या तत्सम पदावरील किमान ०७ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या "सहाय्यक आरोग्य अधिकारी" या संवर्गातील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनासाठी व पदोन्नतीसाठी योग्य अधिकारी उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील योग्य अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
| --- | --- | --- | --- | --- |
| ०२ | श्रेणी-१<br>आरोग्य सेवा | सहाय्यक आरोग्य अधिकारी | नामनिर्देशन | अ)मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर (एम.डी.(पी.एस.एम) परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) मान्यताप्राप्त विद्यापीठाची रुग्णालय प्रशासन पदविका (DHA/DHM) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>क) केंद्र शासनाच्या आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रम/योजना बाबतच्या प्रशासकीय कामाचा किमान ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>ड) राज्यशासन/केंद्र शासन/निमशासकीय/स्थानिक संस्था यांचेडील प्रभाग वैद्यकिय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ०५ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती<br>१०० % | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या वैद्यकिय अधिकारी वा तत्सम संवर्गातील किमान ०३ वर्षाचा अनुभव. |
| ०३ | श्रेणी-३<br>आरोग्य सेवा | विभागीय स्वच्छता निरीक्षक | नामनिर्देशन | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि स्वच्छता निरिक्षक पदविका.<br>ब) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील आरोग्य निरीक्षक/ स्वच्छता निरीक्षक या संवर्गातील किमान ०५ वर्षाचा अनुभव.<br>क) शास्त्र शाखेची पदवीधारकास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती<br>१००% | नामनिर्देशनाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापने वरील स्वच्छता निरीक्षक या पदावर किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून सेवा जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ०४ | श्रेणी-३ आरोग्य सेवा | स्वच्छता निरीक्षक | नामनिर्देशन ५०% | अ) माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण आणि स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण<br>ब) संबंधित कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>क) शास्त्र शाखेची पदवीधारकास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ५०% | नामनिर्देशनाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्वच्छता मुकादम या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असलेल्या कर्मचाऱ्यांमधून जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| ०५ | श्रेणी-४ आरोग्य सेवा | स्वच्छता मुकादम | पदोन्नती १००% | माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता<br>अनुभवः चतुर्थ श्रेणीत किमान ०३ वर्ष सेवा |
| ०६ | श्रेणी-४ आरोग्य सेवा | सफाई कामगार | नामनिर्देशन १००% | (अ) किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण<br>(ब) धडधाकट शरीरयष्टी आवश्यक<br>(क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| ०७ | श्रेणी-४ आरोग्य सेवा | गंगापट्टेवाले | नामनिर्देशन १००% | (अ) किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण<br>(ब) धडधाकट शरीरयष्टी आवश्यक<br>(क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ०८ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिक्षक | नामनिर्देशन | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (M.D./M.S.(CLINICAL)<br>ब) रुग्णालय प्रशासन पदवीका (D.H.A.) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य<br>क) शासन / केंद्र शासन / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील किमान ३०० खाटांच्या रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ०७ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती<br>१००% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील उप वैद्यकिय अधिक्षक संवर्गातील अधिकाऱ्यांमधुन सेवाजेष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ०९ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | उप वैद्यकिय अधिक्षक | नामनिर्देशन | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (M.D./M.S.(CLINICAL)<br>ब) रुग्णालय प्रशासन पदवीका (D.H.A.) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य<br>क) शासन / केंद्र शासन / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील किमान ३०० खाटांच्या रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ०७ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती<br>१००% | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या निवासी वैद्यकिय अधिकारी/ प्रभारी वैद्यकिय अधिकारी किंवा समकक्ष संवर्गातील वैद्यकिय अधिकारी किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १० | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | निवासी वैद्यकिय अधिकारी | नामनिर्देशन | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (M.D./M.S.(CLINICAL)<br>ब) रुग्णालय प्रशासन पदवीका (D.H.A.) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य<br>क) शासन / केंद्र शासन / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील किमान ३०० खाटांच्या रुग्णालयातील वैद्यकीय तज्ञ / वैद्यकिय अधिकारी पदावरील किमान ०५ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती<br>१००% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण कर्मचाऱ्यांमधून नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापने वरील मुख्य वैद्यकिय अधिकारी या संवर्गातील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ११ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | मुख्य वैद्यकिय अधिकारी | नामनिर्देशन | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यकिय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम.डी.) (मेडीसीन)<br>क)अनुभवः सरकारी/ निमसरकारी / खाजगी रुग्णालयातील पर्यवेक्षीय व कार्यकारी कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती<br>१००% | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे वैद्यकिय अधिकारी या संवर्गातून किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| १२ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(न्युरोसर्जन ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संबंधित विषयातील एम.सी.एच. (सुपर स्पेशालिटी डिग्री इन न्युरोलॉजी)<br>ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १३ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(युरोसर्जन) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संबंधित विषयातील एम.सी.एच. (युरोलॉजी) (सुपर स्पेशालिटी डिग्री इन युरोलॉजी)<br>ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| १४ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(कार्डीओलॉजिस्ट/ हृदयरोग तज्ञ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (कार्डीओलॉजी) पदवी<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| १५ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(चेस्ट स्पेशालिस्ट) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (चेस्ट) किंवा एम.बी.बी.एस., डी.टी.सी.डी. व डी.टी.सी.डी. नंतरचा चेस्ट विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| १६ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(प्लास्टीक सर्जन) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संबंधित विषयातील एम.एस. व एम.सी.एच. (प्लास्टीक सर्जरी) (सुपर स्पेशालिटी डिग्री इन प्लास्टीक सर्जरी) किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| १७ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(आय.सी.यु.फिजीशियन/ निवासी फिजीशियन / वैद्यक शास्त्र तज्ञ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (मेडीसीन) किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १८ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(निवासी फिजिशियन / फिजिशियन वैद्यकशास्त्र तज्ञ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (मेडीसीन) किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| १९ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(इन्टेसिव्हिस्ट) | नामनिर्देशन<br>१००% | अ) एम.डी.(मेडीसीन) व इमरजन्सी मेडीकल किंवा तत्सम कोर्स प्रथम प्राधान्य<br>ब) एम.डी.(मेडीसीन) व इमरजन्सी मेडीकल किंवा तत्सम कोर्स द्वित्तीय प्राधान्य<br>क) एम.डी.(ॲनेस्थेशिया) व इमरजन्सी मेडीकल किंवा तत्सम कोर्स तृत्तीय प्राधान्य<br>ड) एम.डी.(ॲनेस्थेशिया) चतुर्थ प्राधान्य<br>इ) एम.डी.(चेस्ट) व इमरजन्सी मेडीकल किंवा तत्सम कोर्स प्रथम प्राधान्य किंवा<br>ई) एम.सी.आय./महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ/ डी.एम.ई.आर. या सम वरिष्ठ अभ्यासक्रम निर्देशित करणाऱ्या संस्थाच्या नियमानुसार. |
| २० | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(शल्य चिकित्सक शल्य विशारद (निवासी) रेसिडेंट सर्जन) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.एस. (शल्य चिकित्सक शास्त्र) ही किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| २१ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(स्त्रीरोग तज्ञ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (स्त्रीरोग व प्रसुती रोग शास्त्र) किंवा एम.बी.बी.एस., डी.जी.ओ. व डी.जी.ओ. नंतरचा स्त्रीरोग व प्रसुती रोग शास्त्र विषयातील किमान ५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| २२ | श्रेणी-१ वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी (बालरोग तत्र ) | नामनिर्देशन १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (बालरोग चिकित्सा शास्त्र) किंवा एम.बी.बी.एस., डी.सी.एच. व डी.सी.एच. नंतरचा बाल रोग चिकित्सा शास्त्र विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| २३ | श्रेणी-१ वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी ( क्ष-किरण तज्ञ रेडीओलॉजिस्ट (रेडीओलॉजिस्ट/ सोनोलॉजिस्ट ) | नामनिर्देशन १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (क्ष-किरण शास्त्र) किंवा एम.बी.बी.एस., डी.एम.आर.डी. व डी.एम.आर.डी. नंतरचा क्ष-किरण शास्त्र विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| २४ | श्रेणी-१ वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी (न्यायवैद्यक शास्त्र तज्ञ) | नामनिर्देशन १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (न्यायवैद्यक शास्त्र) किंवा एफ.एम.टी. किंवा डी.एफ.एम.टी. (फॉरेन्सीक मेडीसीन ॲण्ड टॉक्सीलॉजी) किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| २५ | श्रेणी-१ वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी (विकृती शास्त्र तज्ञ क्लिनीकल पॅथॉलॉजिस्ट ) | नामनिर्देशन १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (शरीर विकृतीशास्त्र) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास, एम.बी.बी.एस. डी.सी.पी. (डिप्लोमा इन क्लिनीकल पॅथॉलॉजी) किंवा समकक्ष पदवीधारकामधून भरण्यात येईल.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील प्रयोगशाळेतील कामाचा ३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| २६ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(बाधिरीकरण तज्ञ)<br>(निवासी भूलतज्ञ ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (ॲनास्थिशिया) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास, एम.बी.बी.एस. पदवी. आणि डी.ए. (डिप्लोमा इन (ॲनास्थिशिया ) किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील प्रयोगशाळेतील कामाचा ३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| २७ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(अस्थिव्यंग तज्ञ,<br>ऑर्थोपेडीक सर्जन ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस. (अस्थिव्यंग शास्त्र) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास, एम.बी.बी.एस. व डी.ऑर्थो ही किंवा समकक्ष पदवी / पदविका उत्तीर्ण.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| २८ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(कान,नाक,घसा तज्ञ ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.एस. (कान,नाक,घसा शास्त्र) (इ.एन.टी) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास एम.बी.बी.एस. व डि.ओ.आर.एल. ही किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| २९ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(नेत्र शल्य चिकीत्सक<br>नेत्र तज्ञ ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.एस. (नेत्र शल्यचिकीत्साशास्त्र) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास एम.बी.बी.एस. व डी.ओ.एम.एस.(नेत्र चिकीत्सा शास्त्र) पदवीका.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| ३० | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(दंत शल्य चिकित्सक ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी.एस.(दंत शल्य चिकीत्सा) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास बी.डी.एस.(दंत शल्य चिकित्सा) पदव्युत्तर पदवी<br>ब) शासकिय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयांतील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ३१ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>( निओटोलॉजिस्ट<br>नवजात अर्भक तज्ञ ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यता प्राप्त विदयापिठाची डी.एम (निओटोलॉजिस्ट) ही किंवा एम.डी. पिडीयाट्रीक्स व एम.डी.पिडीयाट्रीक्स नंतरचा निओटोलॉजिस्ट विषयातील किमान ०३ वर्षाचा अनुभव किंवा एम.डी. पिडीयाट्रीक्स नंतरचा निओटोलॉजि विषयातील Indian Academy of Pediatrics/Medical Concial of Iindia प्रमाणित Fellowship किंवा एम.डी. पिडीयाट्रीक्स नंतरचा निओटोलॉजि विषयातील डी.एन.बी. (निओटोलॉजि) किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकिय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयांतील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य |
| ३२ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>( त्वचा रोग तज्ञ ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (त्वचा व गुप्तरोग शास्त्र) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास एम.बी.बी.एम. व डि.व्ही.डी पदवीका (Diploma in Venral Diaseases) किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकिय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयांतील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य |
| ३३ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(मानसोपचार तज्ञ<br>मानसिक रोग तज्ञ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (मनोविकृती चिकीत्सा शास्त्र) (सायकियॅाट्रीक) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास एम.बी.बी.एम. व मान्यताप्राप्त विद्यापिठाची डि.पी.एम. पदवीका व डि.पी.एम. नंतरचा मनोविकृती चिकीत्साशास्त्र विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय /निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ३४ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(रक्त संक्रमण अधिकारी ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.डी. (शरीर विकृतीशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस. व शरीर विकृती शास्त्रामधील पदवीका व रक्त संक्रमण विषयातील एमसीआय मान्यताप्राप्त संस्थेतील Fellowship अथवा Blood Bank मधील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील प्रयोगशाळेतील कामाचा ३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| ३५ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(एडस नोडल ऑफिसर ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी (M.D. (P.S.M) परीक्षा उत्तीर्ण किंवा एम.बी.बी.एस. व मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवीका(डी.पी.एच.) व सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>अनुभवः शासकीय संस्थेतील एडस संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभव. |
| ३६ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>( पिडीयाट्रीक् सर्जन) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संबंधित विषयातील एम.सी.एच. (पिडीयाट्रीक् सर्जरी) (Super Speciality Degree in Peadiatic Surgery) पदवी किंवा एम.एस.(जनरल सर्जरी) व एम.एस.(जनरल सर्जरी) नंतरचा पिडीयाट्रीक् सर्जरी मध्ये विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा मान्यताप्राप्त संस्थेमधील किमान ०१ वर्षाचा Fellowship व किमान ०२ वर्षाचा अनुभव किंवा एम.एस.(जनरल सर्जरी) नंतरचा डी.एन.बी. पिडीयाट्रीक् सर्जरी व किमान ०१ वर्षाचा अनुभव.<br>ब) शासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| ३७ | श्रेणी-१<br>वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी<br>(मायक्रो बायोलॉजिस्ट ) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी (एम.डी. (मायक्रोबायोलॉजी) तथापि, पदव्युत्तर पदवीधारक उपलब्ध न झाल्यास एमएस्सी (मेडीकल मायक्रोबायोलॉजी) व पी.एच.डी. (मेडीकल मायक्रोबायोलॉजी )<br>अनुभवःपदव्युत्तर पदवीधारकांना कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ३८ | श्रेणी-१ वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी (मेडीकल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर ) | नामनिर्देशन १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यकिय पदवी (एम.बी.बी.एस)<br>ब) मान्यताप्राप्त विद्यापिठाची/संस्थेची पदविका (डिप्लोमा इन हॉस्पिटल मॅनेजमेंट) किंवा (डिप्लॉमा इन हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन)<br>अनुभवः शासकीय /निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| ३९ | श्रेणी-१ वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी (शहर क्षयरोग अधिकारी वैद्यकिय अधिकारी (क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम अधिकारी) | नामनिर्देशन १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यकिय शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी (M.D.Medicine/Cheast) किंवा (M.D. (P.S.M) परीक्षा उत्तीर्ण .<br>ब) राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमाचा किमान ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) शासन / केंद्रशासन/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील वैद्यकिय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ०५ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव<br>ड) रुग्णालय प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषतः स्वच्छता पर्यवेक्षण, साथ रोग निर्मूलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदि बाबींच्या कार्याचा किमान ०५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. |
| ४० | श्रेणी-१ वैद्यकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी (भौतिकोपचार तज्ञ ) (फिजिओथेरपिस्ट) | नामनिर्देशन १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.पी.टी.एच. (फिजिओथेरपी ॲन्ड रिहॅबिटेशनमधील) पदवी.<br>तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद पदविकाधारकामधून भरण्यात येईल.<br>ब) अनुभवः शासकीय /निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. |
| ४१ | श्रेणी-२ आरोग्य सेवा | पशुवैद्यकिय अधिकारी (गट-ब) | नामनिर्देशन १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पशुवैद्यकिय शास्त्रातील पदवी<br>ब) पशुवैद्यकिय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी आणि अथवा संबंधीत कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ४२ | श्रेणी-३<br>निमवैद्यकिय सेवा | मिश्रक | नामनिर्देशन<br>१००% | अ) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (विज्ञान शाखा) उत्तीर्ण<br>ब) औषध निर्माण शास्त्रातील पदविका (डी.फार्म)<br>क) औषध निर्माण शास्त्रातील पदवीधर उमेदवारास प्राधान्य<br>ड) संबंधीत कामाचा ०३ वर्षाचा अनुभव |
| ४३ | श्रेणी-३<br>निमवैद्यकिय सेवा | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | नामनिर्देशन<br>५०% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची रसायनशास्त्र,जीवशास्त्र वा सुक्ष्मजीवशास्त्र या विषयातील पदवी.<br>ब) मान्यताप्राप्त संस्थेची डी.एम.एल.टी परीक्षा उत्तीर्ण.<br>क) वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नती<br>५०% | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील प्रयोगशाळा सहाय्यक / रक्तपेढी सहाय्यक या संवर्गातील कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ४४ | श्रेणी-३<br>निमवैद्यकिय सेवा | आहार तंत्रज्ञ | नामनिर्देशन<br>५०% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची फुड ॲण्ड न्युट्रीशन विषयासह बी.एस.सी. (होम सायन्स) ही पदवी किंवा न्युट्रीशन ॲण्ड डायटिशिअन या विषयामधील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण<br>ब) उक्त अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील आहार तंत्रज्ञ सहाय्यक या संवर्गातील कर्मचाऱ्यातून किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नती<br>५०% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची फुड ॲण्ड न्युट्रीशन विषयासह बी.एस.सी. (होम सायन्स) ही पदवी किंवा न्युट्रीशन ॲण्ड डायटिशिअन या विषयामधील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण<br>ब) उक्त अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील आहार तंत्रज्ञ सहाय्यक या संवर्गातील कर्मचाऱ्यातून किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ४५ | श्रेणी-३<br>निमवैद्यकिय सेवा | मेट्रन | नामनिर्देशन<br>५०% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस.सी. (नर्सिंग) या विषयाची पदवी<br>ब) पदव्युत्तर पदवी उमेदवारस प्राधान्य<br>क) सहाय्यक अधिसेविका या पदावरील शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था मान्यवर रुग्णालयातील ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक |
| | | | पदोन्नती<br>५०% | महापालिकेच्या  आस्थापनेवरील सहाय्यक अधिसेविका (सहाय्यक मेट्रन) संवर्गातील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ४६ | श्रेणी-३<br>निमवैद्यकिय सेवा | असिस्टंट मेट्रन | नामनिर्देशन<br>५०% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस.सी. (नर्सिंग) या विषयाची पदवी<br>ब) पदव्युत्तर पदवी उमेदवारस प्राधान्य<br>क) सहाय्यक अधिसेविका या पदावरील शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था मान्यवर रुग्णालयातील ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक,    किंवा,<br>अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वीची विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका<br>क) सिस्टर (हेडनर्स)/सिस्टर इनचार्ज/नाईट सुपरवायझर म्हणून शासकीय/निमशासकीय खाजगी रुग्णालयातील ७ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक |
| | | | पदोन्नती<br>५०% | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील सिस्टर (हेडनर्स) संवर्गातील सेवेचा किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ४७ | श्रेणी-३ निमवैद्यकिय सेवा | सिस्टर (हेडनर्स) | पदोन्नती १००% | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वीची विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका<br>क) शासकीय / निमशासकीय खाजगी रुग्णालयातील स्टाफ नर्स / नर्स मिडवाईफ म्हणून ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक |
| ४८ | श्रेणी-३ निमवैद्यकिय सेवा | स्टाफनर्स | नामनिर्देशन १००% | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वीची विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका<br>क) शासकीय / निमशासकीय खाजगी रुग्णालयातील परिचारीक म्हणून ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक |
| ४९ | श्रेणी-३ निमवैद्यकिय सेवा | एल.एच.व्ही / पी.एच.एन. | नामनिर्देशन १००% | अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची जनरल नर्सिंग व मिडवाईफ या विषयाची पदविका.<br>क) पब्लिक हेल्थ् नर्सिंग या विषयाचा शासन मान्य अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>इ) असा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर परिचारीका म्हणून ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ५० | श्रेणी-३ निमवैद्यकिय सेवा | ए.एन.एम | नामनिर्देशन १००% | अ) माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण. .<br>ब) शासन मान्यताप्राप्त संस्थेचा ए.एन.एम. अभ्यासक्रम पूर्ण व त्यानंतर कामाचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ५१ | श्रेणी-३<br>आरोग्य सेवा | सांख्यिकी अधिकारी | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची सांख्यिकी विषयासह पदवी<br>ब) सांख्यिकी मधील पदव्युत्तर पदवीधरास आणि तत्सम पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ५२ | श्रेणी-३<br>वैद्यकिय आरोग्य सेवा | कुष्ठरोग तंत्रज्ञ | नामनिर्देशन<br>५०% | अ) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एचएससी) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता<br>ब) मान्यताप्राप्त विद्यापिठ/ संस्थेचा लेप्रसी टेक्निशियन कोर्स उत्तीर्ण<br>क) **अनुभवः** कामाचा ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक |
| | | | पदोन्नती<br>५०% | अ) एस.एस.सी. उत्तीर्ण.<br>ब) एमपीडब्लु व लेप्रेसी टेक्नीशियन कोर्स उत्तीर्ण.<br>क) कुष्ठरोग ॲसिस्टंट पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| ५३ | श्रेणी-२<br>आरोग्य सेवा | जीवशास्त्रज्ञ | प्रतिनियुक्ती<br>१००% | महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य संचालनालयाप्रमाणे योग्य अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती. |
| ५४ | श्रेणी-३<br>आरोग्य सेवा | मलेरिया सुपरवायझर | नामनिर्देशन | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची प्राणीशास्त्र / सूक्ष जीवशास्त्र विषयातील पदवी<br>ब) शासनाचा बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांसाठी विहीत केलेला अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>क) शासनाकडील आरोग्य सहाय्यक (महिला) / आरोग्य सहाय्यक (पुरुष) / अळी निरीक्षक / आरोग्य सहाय्यक (म.नि.) चा अनुभव असल्यास प्राधान्य |
| | | | पदोन्नती<br>१०० | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील आरोग्य सहाय्यक (महिला) / आरोग्य सहाय्यक (पुरुष) / अळी निरीक्षक / आरोग्य सहाय्यक (म.नि.) या संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे.<br>ब) किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| अ. क्र. | सेवा, संवंग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ५५ | श्रेणी-३ आरोग्य सेवा | एक्स-रे-टेक्नीशियन | नामनिर्देशन ५०% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी<br>ब) शासन मान्यताप्राप्त संस्थेतून क्ष्-किरण तंत्रज्ञ या विषयाचे प्रशिक्षण पूर्ण<br>क) वैद्यकिय प्रयोगशाळेतील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नती ५०% | नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे क्ष-किरण सहाय्यक पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव |
| ५६ | श्रेणी-३ आरोग्य सेवा | एक्स-रे-असिस्टंट | नामनिर्देशन १००% | अ) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण<br>ब) क्ष-किरण अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य<br>क) शासकीय / निमशासकीय / खाजगी रुग्णायातील क्ष-किरण फिल्म धुण्याचे (डार्क रुममधील) १० वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ५७ | श्रेणी-३ वैद्यकिय आरोग्य सेवा | प्रोजेक्टनिस्ट | नामनिर्देशन १००% | अ) एस.एस.सी उत्तीर्ण<br>ब) शासनमान्य संस्थेचे १६ एमएम सिनेमा प्रोजेक्टर हाताळण्याची परिक्षा उत्तीर्ण.<br>क) ३५ एमएम चे प्रोजेक्ट मशिन चालविणेचा किमान ०५ वर्षाचा अनुभव व परवानाधारक. |
| ५८ | श्रेणी-३ वैद्यकिय आरोग्य सेवा | कुष्ठरोग असिस्टंट | नामनिर्देशन ५०% | अ) एस.एस.सी उत्तीर्ण.<br>ब) एमपीडब्लु व लेप्रेसी टेक्नीशियन कोर्स उत्तीर्ण. |
| | | | पदोन्नती ५०% | अ) एस.एस.सी उत्तीण.र्<br>ब) एमपीडब्लु व लेप्रेसी टेक्नीशियन कोर्स उत्तीर्ण.<br>क) वॉर्डबॉय, ड्रेसर, आया पदावरील कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव. |

| अ. क्र. | सेवा, संवर्ग व श्रेणी | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ५९ | श्रेणी-४ वैद्यकिय आरोग्य सेवा | ड्रेसर (व्रर्णोपचारक) | पदोन्नती<br>१००% | महापालिकेच्या सेवेतील वॉर्डबॉय / आया या एकत्रित संवर्गातील माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या व किमान ०५ वर्षाचा रुग्णालयातील प्रत्यक्ष सेवेचा अनुभव आवश्यक |
| ६० | श्रेणी-४ वैद्यकिय आरोग्य सेवा | वार्डबॉय | नामनिर्देशन<br>१००% | अ) एस.एस.सी परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासकिय अथवा खाजगी दवाखान्यातील कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव. |
| ६१ | श्रेणी-४ वैद्यकिय आरोग्य सेवा | आया | नामनिर्देशन<br>१००% | इयता ८ वी उत्तीर्ण |
| ६२ | श्रेणी-४ वैद्यकिय आरोग्य सेवा | परिचर शस्त्रक्रिया गृह | नामनिर्देशन<br>१००% | अ) एस.एस.सी परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक |
| ६३ | श्रेणी-४ निम वैद्यकिय सेवा | परिचर-प्रयोगशाळा तंत्रज्ञ | नामनिर्देशन<br>१००% | अ) १२ वी परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासकिय अथवा खाजगी दवाखान्यातील कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव. |

**********************************************

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२२**

**परिशिष्ट (२)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ व ५३ (१) च्या तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठी कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता (पहा (नियम ३))

| .क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी (गट-अ) | नामनिर्देशन/ पदोन्नती/प्रतिनियुक्ती<br><br>(पदोन्नतीने पद भरण्यास प्राधान्य असावे. पदोन्नतीस उमेदवार उपलब्ध नसल्यास नामनिर्देशनाने पद भरण्यात यावे व जर नामनिर्देशनासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रतिनियुक्तीने पद भरण्यात यावे.) | **१) नामनिर्देशन :-**<br>**अ) शैक्षणिक पात्रता :-**<br>(१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा<br>(२) राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांच्याकडील पदवी (बी.ई.फायर) धारण केलेली असावी. किंवा राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांच्या कडील डिव्हीजनल फायर ऑफीसर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केलेली असावी. किंवा The Instititution of Fire Engineers (U.K) किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.-Fire) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Instititution of Fire Engineers (U.K) यांचे सदस्यत्व असावे.<br>(३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठी ज्ञान असणे आवश्यक आहे.(लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>(४) एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) शारीरीक पात्रता**<br>(१) नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ५५ वर्षापेक्षा अधिक नसावे.<br>(२) अग्निशमन सेवेत प्रशासकीय व ऑपरेशनल कामासाठी उमेदवाराची निरोगी व सदृढ शरीरयष्टी असावी.<br>**क) अनुभव :-**<br>"ब" वर्ग महानगरपालिका / शासकीय/ निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**२) पदोन्नती :-**<br>"उप मुख्य अग्निशमन अधिकारी" या पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या तसेच सेवाजेष्ठतेनुसार |

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | पदोन्नतीस पात्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेंत येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३) वेतन** :- शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**४) भत्ते** :- जोखीम भत्ता रु.१०००/- व युनिफॉर्म अपकीप रु.५००/- |
| २ | **उप मुख्य अग्निशमन अधिकारी (गट-ब)** | नामनिर्देशन/ पदोन्नती<br><br>(पदोन्नतीने पद भरण्यास प्राधान्य असावे. पदोन्नतीस उमेदवार उपलब्ध नसल्यास नामनिर्देशनाने पद भरण्यात यावे व जर नामनिर्देशनासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रतिनियुक्तीने पद भरण्यात यावे.) | **१) नामनिर्देशन :-**<br>**अ) शैक्षणिक पात्रता :-**<br>(१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा<br>(२) राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांच्याकडील पदवी (बी.ई. फायर) धारण केलेली असावी. किंवा राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांच्याकडील डिव्हीजनल फायर ऑफीसर पाठयक्रम(अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केलेली असावी.किंवा The Instititution of Fire Engineers (U.K)किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.-Fire) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Instititution of Fire Engineers (U.K) यांचे सदस्यत्व असावे.<br>(३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठी ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहीणे, वाचणे व बोलणे)<br>(४) एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) शारीरीक पात्रता :-**<br>(१) नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ५० वर्षापेक्षा अधिक नसावे.<br>(२) अग्निशमन सेवेत प्रशासकीय व ऑपरेशनल कामासाठी उमेदवाराची निरोगी व सदृढ शरीर यष्टी असावी.<br>**क) अनुभव :-**<br>"ब" वर्ग महानगरपालिका / शासकीय/ निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**२) पदोन्नती :-**<br>"विभागीय अग्निशमन अधिकारी" या पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या तसेच उक्त नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणारा अधिकारी सेवाजेष्ठता व पात्रता या निकर्षावर पदोन्नतीने नियुक्त करणेंत येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणारी नाही. |

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | **३) वेतन** :- शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**४) भत्ते** :- जोखीम भत्ता रु.१०००/- व युनिफॉर्म अपकीप रु.५००/- |
| ३ | **फायर ऑफीसर (विभागीय अग्निशमन अधिकारी) (गट-क)** | नामनिर्देशन/ पदोन्नती/प्रतिनियुक्ती<br><br>(पदोन्नतीने पद भरण्यास प्राधान्य असावे. पदोन्नतीस उमेदवार उपलब्ध नसल्यास नामनिर्देशनाने पद भरण्यात यावे व जर नामनिर्देशनासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रतिनियुक्तीने पद भरण्यात यावे.) | **१) नामनिर्देशन** :-<br>**अ) शैक्षणिक पात्रता** :-<br>(१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा<br>(२) राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांच्याकडील पदवी (बी.ई.फायर)धारण केलेली असावी. किंवा राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांच्याकडील डिव्हीजनल फायर ऑफीसर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केलेली असावी. किंवा The Instititution of Fire Engineers (U.K)किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.-Fire)किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Instititution of Fire Engineers (U.K) यांचे सदस्यत्व असावे.<br>(३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठी ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>(४) एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) अनुभव** :-<br>"ब" वर्ग महानगरपालिका / शासकीय / निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**क) वयोमर्यादा** :- नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असु नये.<br>**२) पदोन्नती** :-<br>"अग्निशमन केंद्र अधिकारी" या पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या तसेच उक्त नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणारा अधिकारी सेवाजेष्ठता व पात्रता या निकर्षावर पदोन्नतीने नियुक्त करणेंत येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणारी नाही.<br>**३) वेतन** :- शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**४) भत्ते** :- जोखीम भत्ता रु.७५०/- व युनिफॉर्म अपकीप रु.३५०/- |

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| ४ | **स्टेशन ऑफिसर (अग्निशमन केंद्र अधिकारी) (गट-क)** | नामनिर्देशन/ पदोन्नती/प्रतिनियुक्ती<br><br>(पदोन्नतीने पद भरण्यास प्राधान्य असावे. पदोन्नतीस उमेदवार उपलब्ध नसल्यास नामनिर्देशनाने पद भरण्यात यावे व जर नामनिर्देशनासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रतिनियुक्तीने पद भरण्यात यावे.) | **१) नामनिर्देशन :-**<br>**अ) शैक्षणिक पात्रता :-**<br>(१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>(२) राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांच्याकडील स्टेशन ऑफीसर ॲण्ड इन्स्ट्रक्टर पाठयक्रम(अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा. किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,महाराष्ट्र शासन यांचा १ वर्षे कालावधीचा उपस्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. किंवा The Instititution of Fire Engineers (U.K) किंवा (India) या संस्थेकडून ग्रेड-१ ही पदवी प्राप्त केलेली असावी.<br>(३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे. यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>(४) एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण<br>**ब) किमान शारीरीक पात्रता :-**<br>(१) उंची -१६५ सें.मी.,(महिला उमेदवारांची उंची १६२ से.मी.),<br>(२) छाती - साधारण८१ सें.मी. फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>(३) वजन- ५० कि.ग्रॅम.<br>(४) दृष्टी - चांगली<br>**क) अनुभव :-**<br>"ब" वर्ग महानगरपालिका/शासकीय/निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**ड) वयोमर्यादा :-**<br>(१) नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा जास्त असु नये.<br>(२) शासकीय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू असणार नाही.<br>**२) पदोन्नती :-**<br>"सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी" या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या तसेच उक्त |

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणारे अधिकारी सेवाजेष्ठता व पात्रता या निकर्षावर पदोन्नतीने नियुक्ती करणेंत येतील. जर राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेकडील स्टेशन ऑफीसर ॲण्ड इन्स्ट्रक्टर कोर्स पूर्ण केलेली नसेल तर उमेदवारांना पदोन्नतीनंतर ०३ वर्षात कोर्स पूर्ण करणे आवश्यक राहील. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३) वेतन** :- शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**४) भत्ते** :- जोखीम भत्ता- रु.७५०/- व युनिफॉर्म अपकिप रु.३५०/- |
| ५ | **सब ऑफिसर (सहाय्यक अग्नीशमन केंद्र अधिकारी) (गट-क)** | नामनिर्देशन/ पदोन्नती/प्रतिनियुक्ती<br><br>(पदोन्नतीने पद भरण्यास प्राधान्य असावे. पदोन्नतीस उमेदवार उपलब्ध नसल्यास नामनिर्देशनाने पद भरण्यात यावे व जर नामनिर्देशनासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रतिनियुक्तीने पद भरण्यात यावे.) | **१) नामनिदेशन** :-<br>**अ) शैक्षणिक पात्रता** :-<br>(१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा<br>(२) राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांचेकडील Station Officer & Instructor पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा ०१ वर्षे कालावधीचा उपस्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. किंवा The Instutation of Fire Engineers (UK) किंवा (India ) या संस्थेकडून ग्रेड-I ही पदवी प्राप्त केलेली असावी.<br>(३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे,यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>**ब) किमान शारीरीक पात्रता** :-<br>(१) उंची -१६५ सें.मी.,(महिला उमेदवारांची उंची १६२ से.मी.),<br>(२) छाती - साधारण ८१ सें.मी. फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>(३) वजन- ५० कि.ग्रॅम.<br>(४) दृष्टी - चांगली<br>**क) अनुभव** :-<br>" ब " वर्ग महानगरपालिकामध्ये "सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी" या पदावर किंवा इतर महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी. |

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | **ड) वयोमर्यादा** :-<br>(१) नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय **४०** वर्षापेक्षा जास्त असु नये.<br>(२) शासकीय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू असणार नाही.<br>**२) पदोन्नती** :-<br>"सबऑफीसर" या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या किंवा लिडींग फायरमन (अग्निशमन प्रणेता) या पदावर किमान ०५ वर्षे नियमित सेवा पूर्ण झालेल्या तसेच उक्त नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी सेवाजेष्ठता व पात्रता या निकषावर पदोन्नतीने ५०% या प्रमाणात अग्निशमन प्रणेता या पदामधून नियुक्त करणेत येतील. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३) वेतन** :- शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**४) भत्ते** :- जोखीम भत्ता- रु.७५०/- व युनिफॉर्म अपकिप रु.३५०/- |
| ६ | **लिडींग फायरमन (अग्निशमन प्रणेता)**<br>**(गट-क)** | नामनिर्देशन<br>२५%<br>पदोन्नती<br>७५% | **१)** नामनिर्देशन :-<br>अ) शैक्षणिक पात्रता :-<br>(१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>(२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा सहा महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयकम पूर्ण केलेला असावा.<br>(३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>(४) एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) किमान शारीरीक पात्रता** :-<br>(१) उंची -१६५ सें.मी.,(महिला उमेदवारांची उंची १६२ से.मी.),<br>(२) छाती - साधारण ८१ सें.मी. फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>(३) वजन- ५० कि.ग्रॅम.<br>(४) दृष्टी - चांगली<br>**क) अनुभव** :- |

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | उमेदवाराला महानगरपालिका/विशेष नियोजन प्राधिकरण / शासकीय / निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये अग्निशमन प्रणेता किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्षे कामाचा अनुभव असावा.<br>**ड) वयोमर्यादा** :- नामनिर्देशनाच्या उमेदवारांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>**२) पदोन्नती** :-<br>“अग्निशामक” या पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा झालेले कर्मचारी यांची सेवाजेष्ठता व पात्रता या निकर्षावर पदोन्नतीने नियुक्ती करणेंत येतील. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३) वेतन** :- शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**४) भत्ते** :- जोखीम भत्ता- रु.५००/- व युनिफॉर्म अपकिप रु.३००/- |
| ७ | **निरीक्षक (बिनतारी संदेश ) (गट-क)** | नामनिर्देशन १००% | **१) नामनिर्देशन** :-<br>**अ) शैक्षणिक पात्रता** :-<br>(१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>(२) महाराष्ट्र राज्य व्यवसायीक शैक्षणिक व प्रशिक्षण संचालनालय यांच्याकडील (औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतल) २ वर्षाचा खालील पैकी कोणताही एक अभियांत्रिकी व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असावा.<br>(अ) मॅकेनिक कम ऑपरेटर इलेक्ट्रॉनीक कम्युनिकेशन सिस्टीम<br>(ब) यांत्रिकी रेडिओ व दुरचित्रवाणी<br>(क) माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक सिस्टम मेन्टेनन्स<br>(ड) वायरलेस मॅकेनिक कम ऑपरेटर<br>(इ) इलेक्ट्रॉनिक्स मॅकेनिक<br>**३) वेतन** :- शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी |
| ८ | **फायरमन (अग्निशामक)** | नामनिर्देशन १००% | **१) नामनिर्देशन** :-<br>**अ) शैक्षणिक पात्रता** :-<br>(१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>(२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण |

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | केलेला असावा.<br>(३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>(४) एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण असावा<br>**ब) किमान शारीरीक पात्रता :-**<br>(१) उंची -१६५ सें.मी.,(महिला उमेदवारांची उंची १६२ से.मी.),<br>(२) छाती - साधारण ८१ सें.मी. फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>(३) वजन- [illegible] कि.ग्रॅम.<br>(४) दृष्टी - चांगली<br>**क) वयोमर्यादा** :- नामनिर्देशनाच्या उमेदवारांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>**२) वेतन** :- किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**३) भत्ते** :- जोखीम भत्ता- रु.५०००/- व युनिफॉर्म अपकिप रु.३००/- |
| ९ | **वाहनचालक (अग्निशमन) (गट-क)** | नामनिर्देशन १००% | **१) नामनिर्देशन :-**<br>**अ) शैक्षणिक पात्रता :-**<br>(१) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>(२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,महाराष्ट्र शासन,मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असल्यास प्राधान्य.<br>(३) वाहनचालक या पदावर किमान ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक<br>(४) वैध जडवाहन चालविण्यासाठी परवाना असणे आवश्यक<br>(५) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>**ब) किमान शारीरित पात्रता :-**<br>(१) उंची -१६५ सें.मी.(महिला उमेदवारांची उंची १६२ से.मी.),<br>(२) छाती - साधारण ८१ सें.मी. फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.) |

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देश<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | (३) वजन - ५० कि.ग्रॅम.<br>(४) दृष्टी - चांगली<br>**क) पाठयक्रम :-**<br>उमेदवाराची नियुक्ती झाल्यानंतर, त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयकम पूर्ण केला नसेल तर त्या प्रशिक्षण केंद्राचा ०३ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील.<br>**ड) वयोमर्यादा** :- नामनिर्देशनाच्या उमेदवारांचे वय **३०** वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>**२) वेतन** :- किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br>**३) भत्ते** :- जोखीम भत्ता- रु.५००/- व युनिफॉर्म अपकिप रु.३००/- |
| १० | **वायरलेस ऑपरेटर (गट-ड)** | नामनिर्देशन<br>१००% | **१) नामनिर्देशन :-**<br>**अ) शैक्षणिक पात्रता :-**<br>(१) उच्च माध्यमिक शालांत शास्त्र शाखेची परिक्षा (एच.एस.सी.)किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>(२) शासन मान्यताप्राप्त संस्थेचा डी.आर.ई. किंवा तत्सम कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक<br>(३) रेडिओ टेक्निशियन या कामाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>**२) वेतन** :- रु.५२००-२०२००/- (ग्रेड वेतन रु.२०००/-) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी |

*****

## नाशिक महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम २०२२

**परिशिष्ट-३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९) च्या कलम ४६५ पोट कलम (१) खंड (ल)च्या तरतुदींनुसार महानगरपालिकांसाठी केलेले नियम

**नियम**

१. **संक्षिप्त शिर्षक व नियम लागू होण्याचा दिनांक :** (अ) या नियमास नाशिक महानगरपालिकेसाठी (अर्हताकारी विभागीय परीक्षा) नियम २०२२ संबोधण्यात येईल.

(ब) सदर नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होतील त्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **व्याख्या :** (१) विषयांत किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमानुसार

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९)

(ब) "आयुक्त" म्हणजे अधिनियमाच्या कलम ३६ प्रमाणे नियुक्त करण्यात आलेला प्राधिकारी व यात अधिनियमाच्या कलम ३९ प्रमाणे नेमणुक करण्यात आलेला हंगामी आयुक्त वा या नियमांच्या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी अधिनियमाच्या कलम ६९ प्रमाणे अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याच्या समावेश होतो.

(क) "कर्मचारी" म्हणजे नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१५ अन्वये नियुक्त कर्मचारी, मात्र प्रतिनियुक्तीने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हे नियम लागू असणार नाहीत.

(ड) "महानगरपालिका" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार निर्माण केलेली नाशिक महानगरपालिका

(इ) "विभागीय परीक्षा" म्हणजे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी घेण्यात येणारी व या नियमांच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

(ई) "परिशिष्ट" म्हणजे या नियमांचे परिशिष्ट

(२) ज्या शब्दांची वा शब्दसमुहांची व्याख्या या नियमांत समाविष्ट करण्यात आली नसेल त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरले असतील तसा समजण्यात येईल.

३. **विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य :** (अ) हे नियम अस्तित्वात आल्याच्या तारखेस महानगरपालिकेच्या आस्थापनेवर स्थायी / अस्थायी स्वरुपात कोणत्याही पदावर नियुक्त असलेल्या व त्या तारखेनंतर नियुक्त होणाऱ्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना परिशिष्ट-३ च्या ब-१ व ब-२ मध्ये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

(ब) उपरोक्त परिशिष्ट-अ मध्ये ज्या संवर्गाचा उल्लेख आलेला नसेल त्या संवर्गातील आयुक्ताच्या मान्यतेने अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी लेखी अथवा लेखी व तोंडी परीक्षा विहित केली जाईल. याकरीता किमान तीस दिवसापेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीची पुर्वसुचना संबंधितांस देण्यात येईल.

४. **कालावधी आणि संधीची संख्या :** (अ) राजपत्राच्या दिनांकापुर्वी नियुक्त केलेल्या व्यक्तीकरिता कालावधी व संधीची संख्या या नियमांच्या अधिन राहून, राजपत्राच्या दिनांकापुर्वी महानगरपालिका कर्मचारी म्हणुन नियुक्त झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या व्यक्तीने, तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधुन नियम १० अन्वये सुट दिलेली नसेल तर राजपत्राच्या दिनांकापासुन ३ वर्षाच्या आत व २ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(ब) नाशिक महानगरपालिका सेवाभरती नियम २०१५ नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासुन ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

५. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक:**

(अ) महानगरपालिकेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेच्या एकुण गुणांच्या किमान ४५% गुण मिळवणे आवश्यक असेल.

(ब) परंतु चतुर्थ संवर्गातील जे कर्मचारी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असतील त्यांना लिपिक या पदावर पदोन्नती मिळण्यासाठी परिशिष्ट ब-१ च्या केवळ प्रश्नपत्रिका १ ची परीक्षा द्यावी लागेल. या कर्मचाऱ्यांना ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ४०% गुण आवश्यक असतील.

(क) प्रत्येक संवर्गातील विहित करण्यात आलेल्या सर्व विषयात वरील (अ) व (ब) च्या तरतुदींच्या आधारे एक वा एकापेक्षा अधिक संधीत उत्तीर्ण झाल्यावरच विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समजण्यात येईल.

**६. अनुग्रह गुण :** संपुर्ण परीक्षेसाठी विहित केलेल्या गुणांच्या ४५% किंवा त्याहून अधिक गुण एखाद्या उमेदवाराने मिळवले असतील परंतु एक किंवा दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिकामध्ये ४५% गुण तो मिळवू शकत नसेल तर त्याला विषयांमध्ये अथवा एकूण परीक्षेत जास्तीत जास्त ४ अनुग्रह गुण जर ज्यामुळे तो परीक्षा उत्तीर्ण होत असेल तर देण्यात येतील. ज्या उमेदवारांना यापुर्वीच्या प्रयत्नांमध्ये सुट देण्यात आलेली आहे. त्यांना सुध्दा ही सवलत देण्यात येईल.

**७. परीक्षेचा अभ्यासक्रम :** विभागीय परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम परिशिष्ट ३-ब-१/३-ब-२ मध्ये विहित केल्याप्रमाणे किंवा शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असेल.

परंतु, अग्निशमन विभागातील उपस्थानक अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठीच्या नागपूर अग्निशमन महाविद्यालयाकडून घेतल्या जाणाऱ्या व अभियांत्रिकी अधिकारी, महाविद्यालय, नाशिक यांचेकडून अभियांत्रिकी विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम त्या परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून जाहीर केल्याप्रमाणे असेल.

**८. प्रशिक्षण :** विभागीय परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परीक्षेपुर्वी किमान ४० तासांचा प्रशिक्षण कार्यक्रम महानगरपालिकेकडून आयोजित करण्यात येईल.

**९. परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम :** एखादा कर्मचारी नियम -४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत आणि संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाहीतर पुढील परिणाम होतील.

(अ) तो परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा नियम -१० च्या पोट-नियम (१) व (२) अन्वये परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यास सूट मिळेपर्यंत त्याला त्याच्या पदावर कायम करण्यात येणार नाही. किंवा त्याच्या पदाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही. अशारितीने रोखून ठेवलेली वेतनवाढ तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधुन नियम -१० च्या पोट-नियम (१) व (२) अन्वये सूट देण्यात आल्याच्या दिनांकापासुन त्याला देय असेल आणि कोणतीही वेतनवाढ रोखून न धरल्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देण्यात येतील. मात्र गतकाळातील थकबाकीची रक्कम अनुज्ञेय नसेल.

(ब) त्याला त्या संवर्गातील आपली ज्येष्ठता गमवावी लागेल म्हणजेच जे कर्मचारी त्याच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नंतर त्यांचा ज्येष्ठता क्रम लागेल. तसेच, अशा ज्या कर्मचाऱ्यांच्या नंतर त्यांचा ज्येष्ठता क्रम लागेल त्या कर्मचाऱ्यास जेष्ठ असणाऱ्या आणि त्याच्या नंतर परंतु नियम -४ मध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या कालावधीत व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नंतरच्या ज्येष्ठता क्रम त्याला देण्यात येईल.

**१०. परीक्षा उत्तीर्ण होण्यामधुन सुट :** (१) राजपत्राच्या दिनांकानंतर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांस परीक्षा उत्तीर्ण होण्यामधुन पुढील बाबतीत सुट देण्यात येईल.

(अ) त्यास यापुर्वीच कर्मचारी म्हणून कायम करण्यात आले असेल अशा प्रकरणी किंवा

(ब) तो सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये यापुर्वीच परीक्षा उत्तीर्ण झाला असेल अशा प्रकरणी किंवा

(२) कोणत्याही दिनांकास कर्मचारी ४५ वर्षे वयाचा झाल्यानंतर त्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

११. परीक्षा सर्वसाधारणपणे वर्षातून एकदा घेण्यात येईल. एखाद्या वर्षी जर कोणत्याही कारणास्तव परीक्षा घेण्यात आली नाही तर कालावधी व संधीची गणना करतांना वगळण्यात येईल.

**१२. निर्वाचनाच्या शक्ती :** या नियमातील तरतुदींनुसार अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या एखाद्या संवर्गास कोणती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे वा कोणत्या संवर्गास ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आहे यासंबंधी कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास त्याबाबतचा आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

## नाशिक महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम २०२२

परिशिष्ट-३ अ

(नियम -३)

विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग

| अ.क्र. | विभाग | संवर्ग | |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक आरोग्य स्वच्छता विभाग | सांख्यिकी अधिकारी / विभागीय स्वच्छता निरीक्षक / स्वच्छता निरीक्षक | |
| परिशिष्ट ब-२ मध्ये विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग | | | |
| अ.क्र. | विभाग | संवर्ग | |
| १ | अग्निशमन | अग्निशामक / ड्रायव्हर ऑपरेटर | |
| | | | |
| महानगरपालिकेव्यतिरिक्त इतर प्राधिकाऱ्याकडून घेतल्या जाणाऱ्या विहित विभागीय परीक्षा. | | | |
| अ.क्र. | विभाग | परीक्षा घेणारा प्राधिकारी | संवर्ग |
| १ | अग्निशमन | अग्निशमन महाविद्यालय, नागपुर | अग्निशमन पर्यवेक्षक/ स्थानक अधिकारी /उपअग्निशमन अधिकारी/ मुख्य अग्निशमन अधिकारी (विभागीय परिक्षा अधिकारी) |

### परिशिष्ट-३-ब-१

**(नियम -३)**

**विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग**

**प्रश्नपत्रिका-१** (गुण १००, वेळ ३ तास)

१. सारांश लेखन

२. टिपणी लेखन

३. पत्र लेखन

४. भाषांतर (इंग्रजीतुन मराठीत)

टिप : या प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल व प्रश्नांची उत्तरे मराठी भाषेत द्यावी लागतील.

**प्रश्नपत्रिका-२** (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट ४ व अनुसूची ड ची प्रकरणे १ ते १९ व विशेष महाराष्ट्र महानगरपालिका नियमाच्या तरतुदीनुसार असलेले प्राधिकारी यांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व कामकाजाची पध्दती.

## परिशिष्ट ३- ब-२
## विभागीय परीक्षा (अग्निशमन)
## विभाग-अग्निशमन
## संवर्ग - अग्निशमन / ड्रायव्हर ऑपरेटर

**तोंडी व प्रात्यक्षिकपरीक्षा :** (१०० गुण)

१) रासायनिकअग्निशामके : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
२) शिड्या : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
३) होज पाईप : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
४) फोम व होम साधने : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
५) हायट्रंट व होज फिटींग्ज : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
६) पंप : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
७) वॉटर रिले : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
८) गाठी : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
९) श्वसन उपकरणे : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा
१०) कवायमत : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

**लेखी परिक्षा :** (१०० गुण, वेळ २ तास)

**१) प्रथमोपचार :** प्रथमोपचार पेटीतील साहित्य व भाजणे, अस्थिभंग, घुसमटणे, रक्तस्त्राव, जखमा यांचेवर करावयाच्या प्रथमोपचाराची माहिती देणे.
**२) वॉचरुम कार्यपध्दती :** वॉचरुममध्ये ठेवल्या जाणाऱ्या रेकॉर्डची माहिती, त्यासाठी वापरली जाणारी कार्यपध्दती नमुने व काल्पनिक संदेशावर वॉचरुमच्या रेकॉर्डमध्ये नोंद करणे.
**३) अग्निशामक व ड्रायव्हर :** पदाच्या कर्तव्याची माहिती असणे व ती कर्तव्य पार पाडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाबद्दलचा तपशिल ड्रायव्हर ऑपरेटर पदाची कर्तव्य.
**४) शिस्त व कर्तव्यपालन :** शिस्तीचे व कर्तव्यपालनाचे अग्निशमन विभागातील महत्त्व व त्यांचे पालन न झाल्यास होणारे परिणाम, कर्तव्यपालन न झाल्यामुळे वा झाल्यामुळे आठवणीत राहीलेल्या एखाद्या प्रसंगाचे वर्गन.

## नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२
## परिशिष्ट-४
## पदोन्नतीसाठी एकीकृत संवर्ग

प्रस्तावना : महानगरपालिकेच्या कामाची व्याप्ती विचारात घेऊन वेळोवेळी विविध संवर्ग निर्माण करण्यात आलेले आहेत. मात्र या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात व त्यांची सेवा ज्येष्ठता निश्चित करण्याकरिता प्रशासकीय कामाच्या सोईसाठी खालीलप्रमाणे एकीकृत संवर्ग निर्माण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निर्माण करण्यात येणाऱ्या एकीकृत संवर्गाचे नाव | समकक्ष पदे | शेरा |
|---|---|---|---|
| | | **तांत्रिकसेवा** | |
| १ | वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय अधिकारी (न्युरोसर्जन), वैद्यकीय अधिकारी (युरोसर्जन), वैद्यकीय अधिकारी (कार्डीओलॉजिस्ट/हृदयरोगतज्ञ), वैद्यकीय अधिकारी (चेस्ट स्पेशालिस्ट), वैद्यकीय | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिकारी (प्लास्टीक सर्जन), वैद्यकीय अधिकारी (आयसीयु, फिजीशियन/निवासी फिजीशियन/वैद्यकशास्त्र तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (निवासी फिजीशियन/फिजीशियन वैद्यकशास्त्र तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (इन्टेसिव्हिस्ट), वैद्यकीय अधिकारी (शल्यचिकित्सक शल्य विशारद (निवासी) रेसिडेंट सर्जन), वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (क्ष-किरण तज्ञ/ रेडीओलॉजिस्ट/सोनोलॉजीस्ट), वैद्यकीय अधिकारी (न्यायवैद्यकशास्त्र तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (विकृतीशास्त्र तज्ञ/क्लिनीकल पॅथॉलौजिस्ट), वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ/निवासी भुलतज्ञ), वैद्यकीय अधिकारी (अस्थिव्यंग तज्ञ, ऑर्थोपेडीक सर्जन), वैद्यकीय अधिकारी (कान, नाक व घसा तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (नेत्रशल्यचिकित्सक/नेत्र तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (दंत शल्यचिकित्सक), वैद्यकीय अधिकारी (निओटोलॉजिस्ट/नवजात अर्भक तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (त्वचा रोग तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (मानसोपचार तज्ञ/ मानसिक रोग तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (रक्तसंक्रमण अधिकारी), वैद्यकीय अधिकारी (एड्स नोडल ऑफिसर), वैद्यकीय अधिकारी (पिडीयाट्रीक सर्जन), वैद्यकीय अधिकारी (मायक्रोबायोलॉजिस्ट), वैद्यकीय अधिकारी (मेडीकल अॅडमिनीस्ट्रेटीव्ह ऑफिसर), वैद्यकीय अधिकारी (शहर क्षयरोग अधिकारी/क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम अधिकारी), वैद्यकीय अधिकारी (भौतिकोपचार तज्ञ/ फिजिओथेरपीस्ट) | |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ/ रक्तपेढी तंत्रज्ञ | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ३ | प्रयोगशाळा सहायक | प्रयोगशाळा सहायक / रक्तपेढी सहायक | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ४ | कक्षसेवक | कक्षसेवक /कक्षसेविका | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ५ | सिस्टर इनचार्ज | सिस्टर इनचार्ज/ नाइट सुपरवायझर | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |

१. या एकिकृत संवर्गातील पदधारक बदलीस आंतरपरिवर्तनीय असतील.

२. समावेशन - जे कर्मचारी नियमीतपणे पद धारण करीत असतील व संबंधित पदाच्या भरतीवेळी वेळोवेळी प्रचलित असलेल्या सेवा प्रवेश नियमांच्या तरतुदीनुसार त्या पदावर नियुक्ती झालेली असेल तर संबंधित स्विकृत संवर्गात त्याचे नियमित समावेश झाले आहे, असे मानले जाईल, म्हणजेच त्याने धारण केलेले पद ज्या एकीकृत संवर्गात समाविष्ट केले असेल त्या एकीकृत संवर्गात त्याचे समावेशन होईल.

३. ज्येष्ठता - एकीकृत संवर्गाची ज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा ज्येष्ठता नियम, १९८९ प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शं. त्र्यं. जाधव,**
शासनाचे उपसचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.